# दि पाचोरा पिपल्स को-ऑप बँक लि. पाचोरा


मुख्यकार्यालय - स्टेशन रोड, पाचोरा

बँकींग व कर्ज विभाग - ☎ २४०३४८, २४००९४ मुख्यकार्यकारी अधिकारी - ☎ २४०५९४

बँकेचा नोंदविलेला कार्यालयीन पत्ता - रेल्वे स्टेशन जवळ, पाचोरा-४२४२०१, जि. जळगांव



रिझर्व बँक लायसेन्स नं. युबीडी एम.एच.६१३ पी./२४/१०/८६ स्थापना : १६/१२/१९६५

(रजि. नं.जे.जी.ए./जी.एन.के./१०५)


## ५५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची सुचना

सन्माननीय सभासद यांस,

दि पाचोरा पिपल्स को-ऑप बँक लि., पाचोरा या संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा **सोमवार दिनांक ३०-०९-२०१९ रोजी दुपारी ३ वाजता श्री अहिर सुवर्णकार मंगल कार्यालय, देशमुखवाडी, पाचोरा** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

१) मागील दिनांक १०/०८/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

२) सन २०१८-१९ सालचा अहवाल, लेखापरिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजुर करणे व सन २०१८-२०१९ सालचा मंजुर अर्थ-संकल्पापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

३) प्राधिकृत अधिकारी यांच्या समितीने शिफारस केल्याप्रमाणे नफा विभागणीस मंजुरी देणे. (अहवाल पान नं. ६ वर दिला आहे.)

४) सन २०१९-२० सालचा अर्थ संकल्प मंजुर करणे. (अर्थसंकल्प अहवाल पान नं. २१ वर तयार केला आहे.)

५) सन २०१८-१९ सालचा वैधानिक तपासणी अहवाल व अंतर्गत तपासणी अहवाल वाचुन नोंद घेणे व सदर अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल स्विकृत करणे.

६) सन २०१९-२० सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व त्यांची फी ठरविण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांच्या समितीस देणे.

७) सन २०१९-२० सालासाठी अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांची फी ठरविण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांच्या समितीस देणे.

८) मा. प्राधिकृत अधिकारी यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : १६/०९/२०१९

| एम.आर. शाह | ॲड. प्रशांत कुमार कुलकर्णी | सी.ए. प्रशांत श्रीकिसन अग्रवाल | पी. एल. परदेशी |
|---|---|---|---|
| शासकीय अधिकारी | अशासकीय सदस्य | अशासकीय सदस्य | मुख्यकार्यकारी अधिकारी |

दि पाचोरा पिपल्स को-ऑप बँक लि. पाचोरा

सुचना :

- ९७ व्या घटना दुरूस्ती व त्या अनुषंगाने झालेल्या महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व बँकेच्या पोटनियमातील बदलानुसार क्रियशिल सभासदत्व हे सभासदाची वार्षिक सभेतील उपस्थिती, सभासदाने किमान रु. १०००/- चे शेअर्स धारण केले असले पाहिजे व संस्थेतील आर्थिक सहभाग ठेवी किंवा कर्ज यानुसार ठरणार आहे. सबब आपण आपले सर्व आर्थिक व्यवहार आपल्याच बँके मार्फत करावे अशी आपणास विनंती आहे.
- गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकुब सभेचे कामकाज सुरु होईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
- बँकेच्या कामकाजाच्या संबंधीत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास तसे बँकेकडे दि.२४.०९.२०१९ पर्यंत लेखी कळवावेत, नंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
- ज्या सभासदांनी आपली भागपत्रके घेतली नसतील त्यांनी बँकेच्या कामकाजाच्या वेळात आपली भाग पत्रके घेवुन जाण्याची कृपा करावी.

## बँकेच्या ग्राहकांना व खातेदारांन नम्र अवाहन

## Know Your Customers

## आपल्या ग्राहकांना ओळखा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचना

भारतीय रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र.युबीडी पीसीबी ३०/०९. १६१.००/२००४-०५ दि. १५ डिसेंबर २००४ नुसार ग्राहक/खातेदारासाठी मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार आपल्या बँकेत ज्या ग्राहकांनी/खातेदारांनी सेव्हिंग ठेव खाते व करंट ठेव खाते उघडली असतील अशा ग्राहकांनी अद्याप आपल्या स्वतःच्या ओळखीसाठी स्वतःचा फोटो, कायम रहीवासाचा पुरावा, आधार कार्ड, पॅनकार्ड, दिलेला नसेल अशा ग्राहकांना बँके तर्फे नम्र आवाहन करतो की, त्यांनी आपल्या बँकेतील खात्यावर आधार नंबर लिंक करून घ्यावा अन्यथा आपले खाते गोठविले जाईल व आपणास खात्यावर व्यवहार करता येणार नाही. याबाबत बँक खातेदारांना एस.एम.द्वारे वेळो-वेळी सुचीत करण्यात येत आहे.

बँकेच्या सर्व ग्राहक, ठेवीदार, खातेदार व सभासद यांनी आपल्या कुटुंबीयासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने बँकेने प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजनेचा लाभ घ्यावा. यासाठी बँकेतील आपल्या खात्यात नियमित व्यवहार करा व पुरेशी रक्कम खात्यात शिल्लक ठेवा. या योजनेचा लाभ आता पर्यंत चार खातेदारांच्या वारसांना झालेला आहे.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बँकेकडे नविन सीटीएस २०१० चेक बुक खातेदारांना दिले जातात. ज्या खातेदारांकडे अद्याप जुने चेक बुक शिल्लक असतील असे चेक इतरांच्या नावाने देऊ नयेत. नवीन चेकबुक मिळण्याची सुविधा मुख्यालयात सुरु आहे.

सहकारी बँकांना सहकारी कायद्यातील कलम ८० पी खाली असलेली आयकराची सवलत काही वर्षापुर्वीच रद्द केल्यानंतर दि. १ जुन २०१५ पासुन सहकारी बँकेच्या सभासदांना व ठेवीदारांना त्यांच्या मुदत ठेवीवरील व्याजाची मर्यादा रू. १०,०००/- वरून रू. ५०,०००/- दि. ०१ एप्रिल २०१९ पासुन झाली आहे. रू. ५०,०००/- पर्यंतच्या मुदत ठेव व्याजावर कर कपात होणार नाही. ज्या ठेवीदारांचे उत्पन्न आयकर पात्र नसेल त्यांनी बँकेकडे असलेला फार्म नं. १५ जी भरून द्यावा व ज्येष्ठ नागरीक म्हणुन जर ठेवीदार असतील त्यांनी फार्म १५ एच भरून द्यावा व त्यासोबत आपल्या पॅनची झेरॉक्स प्रत द्यावी. यासंबंधी आपणास अधिक माहिती बँकेत मिळु शकेल.

### • नवीन आदर्श पोटनियमानुसार क्रियाशील सभासद असण्यासाठी किमान पात्रता •

१) संस्थेच्या सलग पाच सर्वसाधारण सभांपैकी किमान एका वार्षिक सर्व साधारण सभेस सभासदांची उपस्थिती राहिली पाहिजे.

२) क्रियाशील सभासदांचा बँकेच्या कामकाजात आर्थिक सहभाग असणे म्हणजे क्रियाशील सभासदाने किमान रू. १,०००/- चे शेअर्स धारण केले असले पाहिजे.

३) मागील सलग पाच वर्षापैकी किमान दोन वर्षासाठी रू. १०,०००/- किंवा बँक कडुन रू. १५,०००/- कर्ज घेतलेले असले पाहिजे. कर्ज हे नियमित असले पाहिजे.

४) सलग पाच वर्षामध्ये बँकेच्या पोटनियमामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे किमान एकदा बँक पुरवित असलेल्या सेवांपैकी एका सेवेचा लाभ घेतला असल्यास ती व्यक्ती बँकेची क्रियाशील सभासद राहु शकते.

५) वरील प्रमाणे क्रियाशील सभासदासाठी आवश्यक अटी पुर्ण करणाऱ्या सभासदांनाच बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार राहील.

६) आपले व आपल्या कुटुंबातील खाती आपल्या बँकेत उघडुन आपला सर्व व्यवहार याच बँकतुन करा. यासाठी बँकेत स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे.

# ५४ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,**

प्रथम मी आपणा सर्वांचे बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये प्रशासक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करत आहे. आपल्या बँकेच्या ३१ मार्च २०१९ अखेरचा संपलेल्या आर्थिक व्यवहाराचा ५४ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक प्रशासक मंडळाचे वतीने आपणा पुढे सादर करतांना मला मनःपुर्वक आनंद होत आहे.

मा. जिल्हा उपनिबंधक सो. जळगांव यांनी दि. २३.१०.२०१८ पासून श्री. व्ही. एम. जगताप, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भडगांव यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक केली होती. मा. जिल्हा उपनिबंधक सो. जळगांव यांच्या आदेशानुसार दि. १६.०४.२०१९ पासुन प्राधिकृत मंडळ यांची समिती नियुक्त केली आहे. यामध्ये श्री. एम.आर. शाह सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांची शासकीय सदस्य म्हणुन ॲड. श्री. प्रशांत कुमार कुलकर्णी व श्री. प्रशांत श्रीकिसन अग्रवाल (चार्टर्ड अकौनटंन्ट) यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे व बँकेचे कामकाज पहात आहेत.

सर्व सामान्यांचे आर्थिक सबलीकरण आणि तळागाळापर्यंत बँकींग पोहचवण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. स्पर्धात्मक युगात सहकाराच्या उत्कर्षासाठी सर्व सामान्यांच्या हितासाठी बँकेची वाटचाल सुरू आहे. बँकींग लोकहिताचा, सामाजिक बांधिलकी बँकेने जोपासुन बँकेच्या माध्यमातुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. आपल्या सर्वांचे सहकार्य, बँके वरील विश्वास व मार्गदर्शनामुळेच बँकेची प्रगती होत आहे. अहवाल वर्षात बँकेला करपुर्व नफा रू. ३०८.६७ लाख झाला असुन यामधुन सर्व प्रकारच्या तरतुदी व नफ्यावरील आयकर वजा जाता बँकेला रू.१४८.४८ लाखाचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेने केलेल्या या प्रगतीचे श्रेय बँकेचे सभासद, ठेवीदार व असंख्य ग्राहक यांना जाते. आजच्या सर्व साधारण सभेच्या निमित्ताने संपलेल्या आर्थिक वर्षातील घटनांचा परामर्श आपणापुढे सादर करीत आहे.

**सभासद व भाग भांडवल :**

अहवाल वर्षात भाग भांडवलात रू. १३.११ लाखाने वाढ होऊन एकुण भाग भांडवल रू. ६२२.१७ लाख झाले आहे. दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकुण भाग धारक सभासद संख्या ११६६५ आहे. नाममात्र सभासदांची संख्या ३३ आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार भाग भांडवलात वाढ होणे आवश्यक असल्याने सभासदांना नम्र विनंती करण्यात येते की, आपल्या नांवावर रू. १००० पेक्षा कमी शेअर्स असल्यास बाकीची रक्कम भरून बँकेचे भाग भांडवल वाढीस सहकार्य करावे.

**राखीव व इतर निधी :**

बँकेच्या स्वनिधीत सातत्याने वाढ होत असुन बँकेला होणाऱ्या सततच्या नफ्यातुनच बँकेच्या निधी मध्ये वाढ होत असते. अहवाल वर्षात बँकेच्या स्वनिधीत रू. ६२.६७ लाखाची वाढ होऊन आर्थिक वर्षा अखेर बँकेचा एकुण स्वनिधी रू. २७३४.९३ लाख झालेला आहे.

बँकेच्या स्वनिधीत सातत्याने वाढ होत असुन रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे भांडवल पर्याप्तता प्रमाण ९ टक्के पेक्षा जास्त असणे गरजेचे आहे. बँकेने हेच प्रमाण १७.७५ टक्के राखले आहे. यामुळे बँकेची स्थिती भक्कम आहे.

**ठेवी व ठेवी वरील विमा :**

बँकेची प्रगती ही प्रामुख्याने ठेव वाढीवरच अवलंबुन असते इतर बँकाच्या व्याज दराशी तुलनात्मक असे मुदतीनसुार व्याज दर ठरविणे क्रमप्राप्त झाले आहे. यासाठी बँक नेहमीच व्याजदराचा आढावा घेऊन व्याजाचा दर निश्चित करीत असते.

दि. ३१ मार्च २०१९ अखेर बँकेच्या एकुण ठेवी रू. ९२३४.५० लाख आहेत. कमी खर्चाच्या ठेवींमध्ये वाढ होणे महत्वाचे आहे. अशा ठेवींमध्ये CASA ठेवीचे प्रमाण १९.९१% आहे. मासिक ठेव योजनेत ठेवींवर मासिक व्याज दिले जात असुन याचा फायदा असंख्य निवृत्त ठेवीदार व जेष्ठ नागरीक घेत आहेत. बँकेने नवीन ठेव योजना सुरू केलेल्या आहेत, या नवीन योजनेमुळे ठेवी मध्ये वाढ होत आहे.

ठेवीदारांना त्यांच्या ठेवीवर जास्तीत जास्त व्याज मिळावे ह्या हेतुने व्याजदर देण्याचा बँकेचा प्रयत्न राहीला आहे. ठेवींच्या सुरक्षिततेसाठी बँकेने विमा प्रिमियम ची रक्कम डिपॉझीट इन्शुरंन्स ॲड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन या रिझर्व्ह बँकेच्या ठेव विमा विभागाकडे नियमीत पाठविली आहे. आपल्या बँकेच्या ठेवीदारांच्या रूपये १ लाख पर्यंतच्या ठेवीस पुर्णतः विमा संरक्षण मिळत आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या बँकेकडे असलेल्या ठेवी ह्या पुर्णतः सुरक्षित आहेत याची बँक हमी देत आहे. आपल्या ठेवी ह्याच बँकेत ठेवाव्यात व बँकेच्या प्रगतीस सहकार्य करावे. ही विनंती.

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना :**

- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना : वार्षिक प्रिमीयम फक्त १२/- रूपयात २ लाख रूपयांचा अपघात विमा मिळु शकतो. बँकेच्या ज्या ग्राहक, खातेदार, ठेवीदार व सभासदांचे वय १८ ते ७० वर्ष आहे अशा सर्व बचत खातेधारकांसाठी विम्यामध्ये अपघाती कायमचे अपंगत्वाचा देखील समावेश राहील.
- प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना : वार्षिक प्रिमियम फक्त ३३० रूपयात २ लाख रूपयांचा जीवन विमा उपलब्ध आहे. वय १८ ते ५० वर्ष आहे. अशा सर्व बचत खातेदारांसाठी राहील. ग्राहक, खातेदार व सभासदांचे पश्चात त्यांचे कुटुंबियांना देखील या योजनेमधील विमा रक्कम मिळेल. या दोन्ही योजनेत भाग घेण्यासाठी बँकेत बचत खाते असणे आवश्यक आहे. विमा कालावधी वार्षिक १ जुन ते ३१ मे असुन प्रिमीयम रक्कम खातेधारकाच्या बचत खात्यातुन बँक 'ऑटो-डेबीट' सुविधेच्या माध्यमातुन भरला जाईल. कोणीही व्यक्ती केवळ एका बचत खात्याद्वारे ह्या योजनेसाठी पात्र ठरेल. या योजने अंतर्गत ४ खातेदारांच्या वारसांना या योजने अंतर्गत रू. २ लाखाचा लाभ मिळालेला आहे.

**गुंतवणूक :**

बँकेकडील स्वनिधी व ठेवींच्या रक्कमेतुन बँक कर्ज वाटप, कायम मालमत्तेने केलेली गुंतवणुक वजा जाता शिल्लक राहीलेल्या रकमेची सुरक्षित गुंतवणूक रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार व बँकेच्या गुंतवणूक धोरणानुसार, सरकारी रोखे इतर बँकेतील मुदत ठेवीत करावी लागते. रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांना अधिन राहुन आपल्या बँकेने अहवाल वर्षात रोखता व तरलता पुर्णत: राखलेली आहे. सुरक्षित गुंतवणूक करून जास्तीत जास्त व्याज मिळणाऱ्या मुदत ठेवीत गुंतवणूक केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१९ अखेर बँकेने चालु ठेवी, मुदत ठेवी, राज्य व जिल्हा बँकेचे शेअर्स सरकारी रोखे या मध्ये रू. १७९१.७८ लाखाची गुंतवणूक केलेली आहे. या गुंतवणुकीवर बँकेला अहवाल वर्षात रू. २९५.६२ लाखाचे व्याज मिळाले आहे. बँकेच्या ठेवीची रक्कम परत देण्यासाठी केंद्रिय सरकारी रोख्याची विक्री करावी लागल्याने या व्यवहारातुन अहवाल वर्षात बँकेला रू. २७८.०८ लाखाचे नुकसान सहन करावे लागले.

**कर्ज :**

बँकेची नफा क्षमता प्रामुख्याने कर्जावर अवलंबुन असते. कर्ज व्यवहारातील जोखीमांचे वाढते प्रमाण विचारात घेता व एकुण अनुभव विचारात घेता याबाबत धाडस करणे योग्य वाटत नाही, तरी देखील चांगले कर्जदार ग्राहकांचा शोध घेवुन बँकेची नफा क्षमता वाढवावी लागते. ठेवीदारांनी विश्वासाने सोपविलेल्या ठेवींचा रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार व बँकेने आखलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार वित्त पुरवठा करावा लागतो व तसा तो बँकेने केलेला आहे. सर्व सामान्य ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवुन, बँकेने अल्प उत्पन्नातील घटक, आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या तसेच व्यापारी वर्ग, मध्यमवर्गीय, लघु उद्योजक व शेती पुरक व्यवसाय व घर बांधणी करणाऱ्या सर्व स्तरातील सभासदांना कर्ज पुरवठा करून आर्थिक विकासासाठी बँकेचा प्रयत्न राहीला आहे.

दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकुण कर्ज येणे बाकी रू. १०२२२.७१ लाख आहे. गत वर्षाच्या तुलनेत कर्ज बाकी रू.१०९७.६८ लाखाने कमी झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँकेने अग्रक्रम क्षेत्रासाठी ७९.१५% व दुर्बल घटकांसाठी १७.५६% कर्ज पुरवठा केलेला आहे. कर्ज कोणतेही प्रकारचे असो बँकेच्या नियमाप्रमाणे ते वापरणे त्यात उलाढाल करणे योग्यवेळी व्याज व मुद्दलाचे हप्ते भरणे यास अत्यंत महत्व आहे. बऱ्याशा कर्जदार सभासदांनी त्यांच्याकडील कर्जावरील मासिक व्याजाचा भरणा महिन्याच्या ५ तारखेपर्यंत व कर्ज हप्त्यांचा भरणा वेळेत केल्याने अशा नियमीत कर्जदार सभासदांना रू. ६३.१२ लाख व्याज रक्कमेवर १.५० टक्के पर्यंत रिबेट देण्यात आला आहे. त्यामुळे बँकेचे बरेचसे कर्ज नियमित राहीले आहे. सर्वच कर्जदार सभासदांना आवाहन करतो की, त्यांनी आपल्या कडील कर्जाची व्याज व कर्ज हप्ते वेळेवर भरून बँकेच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे.

**थकबाकी :**

अहवाल वर्ष अखेर बँकेची एकुण थकीत कर्ज बाकी रू. १९४३.६४ लाख आहे. थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण १९.०१ टक्के आहे. बँकेने थकीत कर्ज वसुलीसाठी स्वतंत्र वसुली कक्ष निर्माण करून वसुली पथक तयार करण्यात आले आहे. या वसुली पथकामार्फत सक्तीची कर्ज वसुली करण्यात येत आहे. थकीत कर्ज वसुली करीता बँकेच्या ०७ अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासनाकडून १५६ चे अधिकार मिळालेले आहेत, त्यानुसार त्यांना थकीत कर्ज वसुली बरोबरच स्थावर मालमत्ता जप्तीचे व लिलावाचे अधिकार मिळाले आहेत.

महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० या कायद्याचे कलम १०१(१) नियमानुसार मोठ्या थकबाकीदारांवर व त्यांचे जामीनदारांवर चालु वर्षात वसुलीसाठी रू १२४.७१ लाखाची ४७ थकबाकीदारांवर कायदेशिर कारवाई केली आहे. बँकेने अहवाल वर्षात रू. १३८.३० लाखांची २६ जुनी थकीत कर्ज खाती वसुल झाली आहेत. बँकेने कलम १०१(१) अंतर्गत थकीत कर्ज प्रकरणांमध्ये थकीत कर्जदार बरोबरच त्यांचे जामीनदारांच्या स्थावर मालमत्तेवर देखील बोझा नोंदवुन थकीत कर्जाची वसुली करण्यात येत आहे.

थकीत कर्ज वसुलीसाठी बँकेने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अँड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (अंतर्गत) या कायद्याच्या १३ (२) नुसार ७४ थकीत कर्जदार व त्याचे जामीनदार यांना रू. ७११.६६ लाख कर्ज वसुलीसाठी नोटीस पाठविण्यात आली आहे. तसेच या कायद्याच्या कलम १३(४) नुसार काही कर्जदारांच्या स्थावर मिळकतीचा पंचनामा करून मालमत्तेचा अप्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. सिक्युरिटायझेशन कायदा २००२ च्या कलम १४(१) नुसार थकीत कर्जदारांच्या स्थावर मालमत्तेची विक्री करून थकीत कर्ज वसुलासाठी मा. जिल्हाधिकारी सो. जळगांव यांची मंजुरी घेण्यात येत आहे. या कायद्यामुळे थकीत कर्ज वसुली जलद गतीने होणार आहे.

सर्व थकबाकीदार सभासदांना विनंती की, त्यांनी आपली थकबाकी त्वरीत भरून कायदेशिर कटु कार्यवाही टाळावी. कर्ज खातेदारांनी त्यांच्या कर्जाचे हप्ते, व्याज भरून कर्ज खात्यांचे नुतनीकरण वेळच्या वेळी करून खाते थकबाकी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी बँकेस सहकार्य करावे. असे नम्र अवाहन मी सर्व कर्ज खातेदारांना करीत आहे. बँकेच्या थकबाकीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

१) थकबाकीचे तारणानुसार वर्गीकरण : (रूपये लाखांत)

| अ.नं. | कर्जाचा प्रकार | खातेदार | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | अल्पमुदत जामिनकीचे कर्ज | २० | ०.८७ |
| २. | अल्पमुदत व्यापारी कर्ज | १५८ | २७.९१ |
| ३. | कॅश क्रेडीट अल्प मुदत | ११६ | ६२.३३ |
| ४. | कॅश क्रेडीट एम. टी. | २८ | ४.८३ |
| ५. | हायरपर्चेस मध्यम मुदत | ६३ | ५७.८४ |
| ६. | नजर गहाण अल्प मुदत | ९६ | ४९०.९२ |
| ७. | सोने-तारण कर्ज | २ | २.६१ |
| ८. | लघु उद्योग मशिनरी कर्ज | ४ | ६१.८३ |
| ९. | रियल इस्टेट कर्ज | ३२ | ४६२.९१ |
| १०. | सभासद घर बांधणी कर्ज | ११ | २४.४० |
| ११. | हायपोथीकेशन टेम्परी ओव्हर ड्राफ्ट | २७ | ५३.८६ |
| १२. | गोडाऊन माल तारण कर्ज | ४ | १०७.६२ |
| १३. | सिक्युअर्ड कॅश क्रेडीट कर्ज | ३२ | ४६३.५६ |
| १४. | बिझीनेस टर्म लोन | १६ | ३८.४१ |
| १५. | वेअर हाऊस पावती तारणावर | ४ | ७५.७४ |
| | एकुण : | ६९३ | १९४३.६४ |

२) मुदतीनुसार वर्गीकरण : (रूपये लाखांत)

| अ.नं. | तपशिल (मुदत) | खातेदार | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | एक वर्षाच्या आतील | ३१० | १०७८.६७ |
| २. | एक वर्षावरील परंतु २ वर्षाच्या आतील | ८४ | २१६.८१ |
| ३. | २ वर्षावरील परंतु ३ वर्षाच्या आतील | ४३ | १४३.४१ |
| ४. | ३ वर्षावरील परंतु ५ वर्षाच्या आतील | ५७ | ७३.५४ |
| ५. | ५ वर्षावरील | १९९ | ४३१.२१ |
| | एकुण : | ६९३ | १९४३.६४ |

३) थकबाकी वसुलीसाठी केलेली कायदेशीर कारवाई : (रूपये लाखांत)

| अ.नं. | तपशिल | खातेदार | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | लवाद नोटीस दिली | २२३ | ७६८.३३ |
| २. | लवाद दावे दाखल झालेले परंतु निकालाधिन | ५ | ९२.५८ |
| ३. | ३१ मार्च अखेर शिल्लक प्रकरणे (एस.आर.ओ.) | २८७ | ४२९.५७ |
| ४. | चालु थकबाकी | १७८ | ६५३.१६ |
| | एकुण : | ६९३ | १९४३.६४ |

**एन.पी.ए. कर्ज व प्रमाण :**

३१ मार्च २०१९ अखेर बँकेच्या एकुण येणे कर्ज रू. १०२२२.७१ लाख पैकी एकुण रू. १४९७.४६ लाखाचे कर्ज हे एनपीए आहे. दि. ३१ मार्च २०१९ अखेर स्टँडर्ड कर्जासाठी एकुण रू. ५२.०० लाख बुडीत व संशीयत कर्जासाठी एकुण रू. ७२०.०० लाख, एन.पी.ए. व्याजासाठी रू. १३९.०० लाख अशी एन.पी.ए. कर्जासाठी एकुण रू. ९११.०० लाखाची तरतुद झालेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळीच्या परिपत्रकानुसार एन.पी.ए.च्या सर्व तरतुदी बँकेने पुर्ण केलेल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार निव्वळ एनपीए कर्जाचे प्रमाण हे ५ टक्के पेक्षा कमी व ग्रॉस एन.पी.ए. चे प्रमाण ७ टक्के पेक्षा कमी असणे बँकेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. आपल्या बँकेचे निव्वळ एनपीए चे प्रमाण ६.७२ टक्के आहे. परंतु ग्रॉस एन.पी.ए. १४.६५ टक्के राहीले आहे. हेच प्रमाण कमी होण्यासाठी कर्जदार सभासदांनी त्यांच्या कडील व्याजाची मुद्दलाची, कर्ज हप्त्यांचा वेळीच भरणा करून खाते एन.पी.ए. होणार नाही व एन.पी.ए. कर्जाचे प्रमाण वाढणार नाही यासाठी बँकेस सहकार्य करावे ही विनंती.

**बँकेने येणे कर्जाची वर्गवारी खालील प्रमाणे केली आहे.**

| अ.नं. | वर्गवारी | रक्कम लाखांत |
|---|---|---|
| १. | स्टँडर्ड ॲसेटस | ८७२५.२५ |
| २. | सब स्टँडर्ड ॲसेटस | ६३३.७५ |
| ३. | डाऊटफुल ॲसेटस | ८६३.७१ |
| | एकुण : | १०२२२.७१ |

**भांडवल पर्याप्तता (CRAR) :**

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे भांडवल पर्याप्ततांचे प्रमाण ९ टक्के ठेवणे आवश्यक आहे. बँकेने हेच प्रमाण १७.७५ टक्के एवढे ठेवले आहे. याचाच अर्थ बँकेची सांपत्तीक स्थिती भक्कम असल्याचे हे प्रमाण आहे. बँकेकडे असलेला स्वनिधी व त्यांचे मालमत्तेशी असलेले प्रमाण खालील प्रमाणे आहे.

**भांडवल पर्याप्तता (CRAR) :**

(आकडे लाखांत)

| अ.नं. | तपशिल | रक्कम व प्रमाण |
|---|---|---|
| १. | टायर १ कॅपीटल (Tier I Capital) | १२६९.३४ |
| २. | टायर २ कॅपीटल (Tier II Capital) | ३७०.९३ |
| ३. | एकुण टायर १+२ कॅपीटल (Total Capital) | १६४०.२७ |
| ४. | एकुण रिस्क वेटेड अॅसेट (Total Risk weighted Assets) | ९२३९.७३ |
| ५. | **एकुण कॅपीटलशी रिस्क वेटेड अॅसेटशी प्रमाण** (Percentage to Risk weighted assets to Capital Fund) | **१७.७५%** |

**बँकींग सेवा :**

बँक आपल्या ग्राहकांना एस.एम.एस. सेवा देत आहे एच.डी.सी. बँक सोबत करार केला असुन या बँकेच्या माध्यमातुन आपल्या बँकेत ग्राहकासाठी आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सेवा कार्यरत आहे. आपल्या बँकेच्या सर्वच शाखाना आय.एफ.सी.कोड मिळाला असुन शाखनिहाय I.F.S.C. कोड खालील प्रमाणे आहेत. खातेदारांना विनंती करण्यात येते की, आपण आपल्या खात्यातुन NEFT किंवा RTGS द्वारे व्यवहार करू शकतात. यासाठी अल्प कमिशन दर बँकेने ठेवलेला आहे. या सेवेचा अनेक सभासद, खातेदार, ठेवीदार, ग्राहक लाभ घेत आहेत.

| अ.नं. | शाखा | आय.एफ.एस.सी.कोड (IFSC Code) | मायकर कोड (MICR CODE) |
|---|---|---|---|
| १. | पाचोरा | HDFC0CPPCB1 | 424837102 |
| २. | जामनेर | HDFC0CPPCB2 | 424837501 |
| ३. | नगरदेवळा | HDFC0CPPCB3 | 424837502 |
| ४. | शेंदुर्णी | HDFC0CPPCB4 | 424837503 |
| ५. | भडगांव | HDFC0CPPCB5 | 424837504 |
| ६. | जळगांव | HDFC0CPPCB6 | 425837002 |

**कोअर बँकींग :**

बँकेत कोअर बँक प्रणाली द्वारे व्यवहार होत आहेत. खातेदार, सभासद, ग्राहक यांना तत्पर बँकिंग सेवा उपलब्ध झाली आहे. बँकेच्या सर्व शाखा व मुख्यालय कोअर बँकिंग प्रणालीने जोडल्या गेल्या आहेत. बँकेचे असंख्य सभासद, खातेदार, ग्राहक कोअर बँक प्रणालीचा लाभ घेत आहेत. बँकेचे ग्राहक हे आपल्या जवळच्या शाखेतुन आपले व्यवहार करू शकतात. सर्व सभासदांनी आपले बचत / चालु खाते आपल्या बँकेतच सुरू करावे व या सवेचा लाभ घ्यावा ही विनंती.

**नफा व नफा वाटणी :**

बँकेला अहवाल वर्षात सर्व प्रकारचे उत्पन्न रू. १९७१.२४ लाख झाले आहे. या उत्पन्नातुन प्रत्यक्षात झालेले सर्व प्रकारचे खर्च, कायम मालमत्ते वरील घसारा, सहकार कायदा व पोटनियमानुसार बँकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कराव्या लागणाऱ्या तरतुदी बँकेने पुर्ण केल्या आहेत. बँकेने केलेल्या तरतुदींमुळे बँकेची आर्थिक स्थिती भक्कम झाली आहे. बँकेला तरतुदी पुर्वी कर पुर्व ढोबळ नफा रू. ३०८.६७ लाखाचा झाला असुन, आयकर तरतुद रू. ८६.१९ लाख एन.पी.ए. बुडीत व संशयीत व स्टँडर्ड कर्जासाठी रू. ७४.०० लाख या सर्व तरतुदी बँकेने केल्या आहेत. बँकेला मिळालेल्या सर्व प्रकारच्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च, तरतुदी वजा जाता बँकेला निव्वळ नफा रू. १४८.४८ लाख झाला आहे. बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांच्या समितीने खालील प्रमाणे नफा विभागणी करून वार्षिक सभेच्या मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे, यास सभेने मान्यता द्यावी ही विनंती.

**नफा विभागणी**

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंडात २५ टक्के प्रमाणे (Statutory Reserve Fund) | ३७,१२,९७३.०० |
| २. | गुंतवणुक चढ-उतार निधी (Investment Fluctuation Fund) | २०,००,०००.०० |
| ३. | बुडीत व संशयीत कर्ज निधी (Bad & Doubtful Debts Fund) | ९१,३५,३३१.७८ |
| | **एकुण :** | **१,४८,४८,३०४.७८** |

बँकेने दि. ३१ मार्च २०१९ अखेर रू. १६०८.७४ लाखाची केंद्रिय सरकारी रोखे मध्ये गुंतवणूक केलेली आहे. या गुंतवणुकी पैकी रू. १२५३.२४ लाखाची रक्कम अव्हेलेबल फोर सेल व रू. ३५५.५० हेल्ड टु मॅच्युरीटी या वर्गात वर्गीकृत केली आहे. अव्हेलेबल फोर सेल या वर्गीकरणानुसार या गुंतवणुकीवर रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार किमान ५ टक्के रू. ६२.६६ लाखाची रक्कम चढ-उतार निधी म्हणुन उभारणे संस्थेला बंधन कारक आहे. बँकेने तो रू. १०२.५० लाख उभारला आहे. गुंतवणूक चढ-उतार निधी वर्षाच्या सुरूवातीला रू. १७२.५० लाख होता. यामध्ये रू. १३०.०० लाखाची आवश्यकते पेक्षा जादा रक्कम नफा-तोटा उत्पन्नात जमा घेतली आहे. केंद्रिय सरकारी रोखांच्या किंमती दि. ३१ मार्च २०१९ च्या फिम्डा प्राईज नुसार गुंतवणूक घसारा निधी रू. १८०.६८ लाख इतका उभारला आहे. या प्रमाणे नफा विभागणीस मा. प्राधिकृत अधिकारी यांच्या समितीने शिफारस केलेली आहे यास सभेने मान्यता द्यावी हि विनंती.

**लाभांश :**

रिझर्व्ह बँकेने जाहिर केलेल्या नवीन धोरणानुसार बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) ९% पेक्षा जास्त राखण्याचे बंधन आहे. ते प्रमाण बँकेने १७.७५% इतके राखले आहे. निव्वळ अनुत्पदित कर्जाचे (NPA) प्रमाण ५% पेक्षा कमी असण्याचे बंधन आहे. एन.पी.ए. चे प्रमाण ६.७२% आहे. सी.आर.आर./एस.एल.आर. योग्य प्रमाण राखणे, गुंतवणुकीसाठी योग्य तरतुदी असणे रिझर्व्ह बँकेच्या ध्येय धोरणांचे पालन आपल्या बँकेने पुर्ण केले आहे. बँकेच्या सभासदांना जास्तीत जास्त लाभांश मिळावा हा बँकेचा सतत प्रयत्न राहीला आहे. बँकेचा निव्वळ एन.पी.ए. जरी ५% पेक्षा जास्त असल्याने रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणानुसार ग्रॉस एन.पी.ए. प्रमाण १४.६५% असल्याने, सभासदांना अहवाल वर्षात लाभांश वाटप करता येणार नाही. थकीत कर्जाचे/एन.पी.ए. चे प्रमाण कमी झाल्यानंतरच सभासदांना लाभांश देता येईल.

**बाहेरील कर्ज :**

दैनंदिन व्यवहारात बँकेला काही वेळा बाहेरून कर्जाची उभारणी करावी लागत असते. महाराज्य राज्य सह. बँक, जिल्हा मध्य. सह बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडुन मुदत ठेवीचे/केंद्रीय सरकारी रोखे तारणावर ओव्हर ड्रॉफ्ट मर्यादा मंजुर केलेली आहे. या कर्जाचा दैनंदिन व्यवहारात गरजेनुसार क्लेअरींग व दैनंदिन व्यवहारासाठी वापर केला जातो व त्याची वेळीच परत फेड देखील केली जात आहे. ३१ मार्च २०१९ अखेर बाहेरील कर्जाची येणे बाकी रू. ६१८.३२ लाख आहे. इतर कोणत्याही प्रकारचे कर्ज बँकेने घेतलेले नाही. बँकेने केलेल्या गुंतवणुकी मधुनच बँक बाहेरील कर्जाची आवश्यकता भागवित आहे.

**संचालक मंडळ व प्राधिकृत अधिकारी समिती सभा :**

मा. जिल्हा उपनिबंधक सो. जळगांव यांनी दि. २३.१०.२९१८ पासुन श्री. व्ही. एम. जगताप, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भडगांव यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक केली होती. मा. जिल्हा उपनिबंधक सो. जळगांव यांच्या आदेशानुसार दि. १६.०४.२०१९ पासुन अधिकृत अधिकारी यांची समिती नियुक्त केली आहे. यामध्ये श्री. एम.आर. शाह सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून तर ॲड. श्री. प्रशांत कुमार कुलकर्णी व श्री. प्रशांत श्रीकिसन अग्रवाल (चार्टर्ड अकौन्टंन्ट) यांची अशासकीय सदस्य म्हणुन नियुक्ती झाली आहे व ते बँकेचे कामकाज पहात आहेत.

वर्षभरात संचालक मंडळाच्या/प्राधिकृत अधिकारी समितीच्या १० सभा झाल्या आहेत. कर्ज समितीच्या ६, शेअर्स समितीच्या ६ व गुंतवणूक समितीची ६, कर्ज वसुली समितीच्या ०२, ऑडीट व इन्स्पेक्शन समितीची ३, ॲसेटस व लॅबिलीटीज समितीच्या २ सभा व संगणक व हार्डवेअर कमिटीच्या ५ सभा झालेल्या आहेत. बँकेच्या सर्वांगीण प्रगती करीता व कामकाज गतीमान होण्याकरीता शासकीय अधिकारी व समिती सदस्य बँकेच्या कामकाजात सातत्याने सहभागी होतात.

**मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचे कडील कर्ज :**

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चा कलम ७५(२) मधील तरतुदी नुसार संचालक मंडळावरील सदस्य आणि त्यांच्या नातेवाईक यांचे कडे दि. ३१ मार्च २०१९ अखेर कर्ज येणे बाकी नाही.

**हिशोब तपासणी व ऑडीट वर्ग :**

- रिझर्व्ह बँक तपासणी : दि. ३१ मार्च २०१९ अखेरची रिझर्व्ह बँक तपासणी श्री. पी. के. मोहंती असि. जनरल मॅनेजर व श्री. अपूर्व पाठक, मॅनेजर यांनी पूर्ण केली आहे. त्यांनी बँकेस मोलाचे मार्गदर्शन केले. बँक करीत असलेल्या प्रगतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.
- वैधानिक लेखा परिक्षण : सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखा परिक्षण बी.एस. फडणविस ॲंड असोसिएटस, चार्टर्ड अकौन्टट, नासिक यांनी पुर्ण केले असुन त्यांचा अहवाल बँकेस दि. २३.०८.२०१९ रोजी प्राप्त झाला आहे. बँकेस ऑडीट वर्ग 'क' मिळाला आहे. हिशोब तपासणीस यांचे कडून बहुमोल मार्गदर्शन बँकेला मिळाले आहे. त्यांच्या मार्गदर्शना बद्दल व सुचना बद्दल बँक त्यांची आभारी आहे.
- अंतर्गत लेखा परिक्षण : सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची हिशोबांची अंतर्गत तपासणी जितेंद्र बी. गांधी ॲंड कंपनी, चार्टर्ड अकौंटन्टस, जळगांव यांनी पुर्ण केले आहे. त्यांचा लेखा परिक्षण अहवाल बँकेस दि. २७.०५.२०१९ रोजी प्राप्त झाला आहे. त्यांचे कडुन दैनंदिन कामकाजात मोलाचे मार्गदर्शन मिळत आहेत.

**सेवक वर्ग :**

बँकेचा अविभाज्य व महत्वाचा घटक असलेल्या सेवकांचा सहभाग बँकेच्या प्रगतीत व कार्यात आहेच. बँकींग क्षेत्रातील होणारे नवीन बदल व लागु होणारे निकष, कायदेकानुन याचे पुर्ण ज्ञान सेवकांना व्हावे व त्यांचा कामाचा दर्जा उंचवावा यासाठी त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रमात पाठविले जात असते. काही वेळा सर्वच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी बाहेरील तज्ञ प्रशिक्षक बँकेतच बोलविले जातात. यामुळे सर्व स्थरातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण मिळत आहे. त्यामुळे बराचसा कर्मचारी वर्ग प्रशिक्षीत झाला आहे. आज रोजी बँकेच्या सेवेत सर्व शाखांसह एकुण सेवकांची संख्या ४४ असुन यात १६ अधिकारी, २१ लेखनिक, ०७ कनिष्ठ सेवक काम करीत आहेत. आपल्या बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी म्हणुन श्री. पी. एल. परदेशी हे दि. ३०.०५.२०१९ पासुन बँकेच्या सेवेत कार्यरत आहेत.

ठेवी गोळा करणे, थकबाकी वसुली साठी बँकेच्या सर्वच कर्मचाऱ्यांचा सहभाग राहिला आहे. तरी देखील त्यांच्याकडुन अधिक परिश्रमाची व उत्तम कार्यक्षमतेची अपेक्षा आहे. बँकेने आखलेल्या ध्येय धोरणांची प्रत्यक्षात अंमलबाजावणी काटेकोर पणे करून बँक ग्राहकांना चांगल्या प्रकारे सेवा देत आहे. हे नमुद करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. बँकेच्या प्रगतीचा एक अविभाज्य घटक म्हणुन प्राधिकृत मंडळाच्यावतीने सेवकांना धन्यवाद देतो.

**पुरस्कार, सत्कार समारंभ, भेटी व उल्लेखनिय घटना :**

१. आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या १६ वारसांना आर्थिक मदत देण्याचा कार्यक्रम दि. १४ जुलै २०१८ रोजी पार पडला. शेतकरी आणि सहकार हेच समाज व राज्याच्या प्रगतीचे शिल्पकार असुन शेतकरी केंद्र बिंदु व सहकारी संस्था सामाजिक सुबत्तेचे प्रमुख साधन आहे असे प्रतिपादन सहकार राज्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. बँकेच्या वतीने आयोजीत सभासद पाल्यांचा गुणगौरव व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत या कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. याप्रसंगी आमदार किशोर आप्पा पाटील, माजी आमदार दिलीपभाऊ वाघ, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष मनसुखलाल जैन, नगराध्यक्ष संजय गोहील, उपाध्यक्ष शरद पाटे प्रमुख पाहुणे होते. बँक सभासदांच्या सुमारे दोनशे गुणवंत पाल्यांचा सन्मान पत्र व भेटवस्तु देऊन गौरविण्यात आले. २०१४ पासुन ते आजपर्यंतच्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या १६ वारसांना प्रत्येकी साडेसात हजाराचा धनादेश व साडीचोळी देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. संचालक श्री. भागवत महालपुरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.सी.एन. चौधरी यांनी सुत्रसंचालन केले. बँकेचे संचालक श्री. जयंत पाटील यांनी आभार मानले.

२. मा. श्री. मिलींद भालेराव साहेब, विभागीय सह. निबंधक सहकारी संस्था, नासिक व मा. श्री. एम. यु. राठोड, जिल्हाउपनिबंधक सह. संस्था, जळगाव यांनी दि. ०४ एप्रिल २०१९ रोजी बँकेस सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी बँकेच्या सांपत्तीक स्थितीचा आढावा घेतला व बँक करीत असलेल्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

**हार्दिक आभार व कृतज्ञता :**

१. मा. श्री. गिरीशभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री तथा उच्च शिक्षण मंत्री महाराष्ट्र शासन तथा जळगांव जिल्हा पालक मंत्री
२. मा. श्री. नाथाभाऊ एकनाथरावजी खडसे साहेब, माजी कृषी, महसुल, उत्पादन शुल्क, पशु संवर्धन मंत्री व जळगांव जिल्हा पालक मंत्री.
३. मा. श्री. उन्मेशदादा पाटील खासदार, जळगांव जिल्हा ग्रामीण लोकसभा मतदार संघ.
४. मा. श्री. ए. टी. नाना पाटील, माजी खासदार, जळगांव जिल्हा ग्रामीण लोकसभा मतदार संघ.
५. मा. श्री. किशोर आप्पा पाटील, आमदार, पाचोरा-भडगांव विधान सभा मतदार संघ.
६. मा. श्री. गुलाबरावजी पाटील, सहकार राज्य मंत्री महाराष्ट्र शासन.
७. मा. श्री. दिलीप भाऊ वाघ, माजी आमदार पाचोरा-भडगांव विधान सभा मतदार संघ.
८. मा. श्री. संजय नाथालाल गोहील, नगराध्यक्ष, नगरपालिका, पाचोरा
९. मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ ज. जि. मध्य. सह. बँक लि. जळगांव.
१०. मा. सरव्यवस्थापक (सहकारी बँक पर्यवेक्षक विभाग) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपुर.
११. मा. श्री. सतीश सोनी सहकार आयुक्त आणि निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
१२. मा. श्री. मिलींद भालेराव साहेब, विभागीय सह. निबंधक सह. संस्था, नासिक.
१३. मा. श्री. एम. यु. राठोड, जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, जळगांव.
१४. मा. श्री. एन. के. सुर्यवंशी, सहा. निबंधक सो. सहकारी संस्था, पाचोरा.
१५. मा. कार्यकारी संचालक, जळगांव जिल्हा मध्य. सह. बँक लि. जळगांव.
१६. मा. कार्यकारी संचालक, प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., मुंबई.
१७. मा. श्री. विद्याधरजी अनस्कर साहेब अध्यक्ष व संचालक मंडळ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक फेडरेशन लि. मुंबई.
१८. मा. श्री. शरद अप्पाराव मैद अध्यक्ष महाराष्ट्र राज्य बँक असोसिएशन, मुंबई.
१९. मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, जळगांव जिल्हा अर्बन बँक असोसिएशन, जळगांव.
२०. मा. विभागीय उपव्यवस्थापक व शाखाधिकारी, जळगांव जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. पाचोरा.
२१. बँकेच्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीयकृत व शेडुल बँकांचे व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी वर्ग.
२२. बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरी सह बँका व पतसंस्थांचे अध्यक्ष, संचालक मंडळ व व्यवस्थापक.

**समारोप :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सहकारी बँक पर्यवेक्षक विभाग, नागपुर चे विविध विभागात कार्यरत मा. अधिकारी वर्ग, शासनाच्या सहकार विभागातील अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल बँक त्यांची आभारी आहे. महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य अर्बन बँक फेडरेशन व असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांनी देखील वेळोवेळी केलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल आभारी आहोत.

सर्व भागधारक सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक पाचोरा तालुक्यांचे स्थानिक आमदार, शहराचे नगराध्यक्ष सहकार व राजकीय क्षेत्रातील मान्यवर यांचा बँकेच्या प्रगती मध्ये जो सहभाग आहे, तो अमुल्य असुन बँकेला मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. यापुढे ही असेच सहकार्य मिळत राहील असा आत्मविश्वास बाळगतो.

कर्जदार सभासदांनी आपल्या कडील कर्जाचे व्याज व हप्ते वेळेवर भरून सहकार्य करावे. तसेच थकबाकीदार सभासदांनी आपल्या कडील थकीत कर्जाचा भरणा करावा. असे आवाहन करीत आहोत. आपल्या सहकार्यामुळेच बँकेच्या नफ्यात व स्वनिधी मध्ये वाढ होऊन बँकेच्या सभासदांना लाभांश देता येईल अशी आम्ही आशा बाळगतो.

पाचोरा, जामनेर, शेंदुर्णी, भडगांव, जळगांव येथील दैनिक व साप्ताहिक वर्तमान पत्रांनी तसेच वर्तमान पत्रांचे संपादक, वार्ताहर यांनी, आम्ही केलेल्या कार्याला वेळोवेळी प्रसिद्धी देवुन, सर्व दुर पोहचविल्याबद्दल बँक त्यांची ऋणी आहे.

बँकेच्या अखंड प्रगतीकडे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आम्हाला सहाय्य केलेल्या ज्या ज्ञात अज्ञात व्यक्ती विस्करणीने ज्यांचा उल्लेख झाला नसेल अशा सर्व व्यक्ती, विविध संस्था यांचे ही आम्ही आभार मानतो.

धन्यवाद !

• आपले सहकारी •

| एम. आर. शाह<br>शासकिय सदस्य | ॲड. प्रशांत कुमार कुलकर्णी<br>अशासकीय सदस्य | सी.ए. प्रशांत श्रीकिसन अग्रवाल<br>अशासकीय सदस्य | पी. एल. परदेशी<br>मुख्यकार्यकारी अधिकारी |
|---|---|---|---|

# परिशिष्ट 'अ'

| | |
|---|---|
| बँकेचे नांव व पत्ता | : दि पाचोरा पिपल्स को-ऑप बँक लि. पाचोरा<br>रेल्वे स्टेशन जवळ, पाचोरा-४२४२०१, जि. जळगांव |
| नोंदणी क्रमांक दिनांक | : जे. जी. ए./बी. एन. के. / १०५ दिनांक १६/१२/१९६५ |
| रिझर्व्ह बँक लायसेन्स नंबर व दिनांक | : यु.बी.डी./एम.एच. ६१३ पी. दिनांक २४/१०/१९८६ |
| कार्यक्षेत्र | : जळगांव जिल्हा |
| एकुण शाखा | : मुख्यकार्यालयासह एकुण : ६ |
| ई-मेल | : pachorapeoples@yahoo.in |

दि. ३१ मार्च २०१९ अखेर तपशिल (रूपये लाखांत)

| | |
|---|---|
| **सभासद** | |
| १) भागधारक (संख्या) | : ११,६६५ |
| २) नाममात्र (संख्या) | : ३३ |
| बँकेचे अधिकृत भाग भांडवल | : १,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : ६२२.१७ |
| एकुण राखीव व इतर निधी | : २११२.७६ |
| **ठेव** | |
| १) सेव्हिंग ठेव | : १,४१०.९२ |
| २) चालु ठेव | : ४२७.५५ |
| ३) मुदत ठेव | : ७,३९६.०३ |
| एकुण ठेव | : ९,२३४.५० |
| **कर्ज** | |
| १) सुरक्षित | : १०,२२१.४१ |
| २) असुरक्षित | : १.३० |
| एकुण कर्ज येणे बाकी | : १०,२२२.७१ |
| कर्ज पुरवठा अग्रक्रम क्षेत्र | : ८,०९०.९६ प्रमाण ७९.१५% |
| कर्ज पुरवठा दुर्बल घटक | : १,४२०.७७ प्रमाण १७.५६% |
| **बाहेरील कर्ज** | |
| १) स्टेट बँक ऑफ इंडिया (मुदत ठेव तारण) | : २७.५६ |
| २) जळगांव जिल्हा मध्य. सह. बँक लि. (मुदत ठेव तारण) | : १७.३३ |
| ३) महा. राज्य सह. बँक लि., मुंबई गव्हं. सिक्यु. ओ.डी. | : ५७३.४३ |
| एकुण | : ६१८.३२ |
| **गुंतवणूक** | : १,७९१.७८ |
| **थकबाकी** | : १,९४३.६४ (१९.०१%) |
| **निव्वळ N.P.A. चे प्रमाण** | : ६.७२% (रू. ६२८.८८ लाख) |
| **ग्रॉस N.P.A. चे प्रमाण** | : १४.६५% (रू. १,४९७.४६ लाख) |
| **स्वभांडवल पर्याप्तता प्रमाणक (CRAR)** | : १७.७५% |
| **वैधानिक तपासणी ऑडीट वर्ग** | : 'क' सन २०१८-२०१९ |
| **निव्वळ नफा** | : १४८.४८ |
| **खेळते भांडवल** | : १३,११४.६६ |
| **एकुण सेवक वर्ग** | : ४४ |

३१ मार्च २०१९ रोजी

| सन २०१७-२०१८ रुपये पैसे | जबाबदाऱ्या | रुपये पैसे | सन २०१८-२०१९ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **१] शेअर्स भांडवल** | | |
| १०,००,००,०००.०० | १) अधिकृत शेअर्स २०,००,००० शेअर्स प्रत्येकी ५० प्रमाणे | १०,००,००,०००.०० | |
| ६,०८,९७,८००.०० | २) विक्री झालेले भांडवल १२,४४,३३६ शेअर्स प्रत्येकी रू. ५० प्रमाणे | | ६,२२,१६,८००.०० |
| | **२] वैधानिक निधी व इतर निधी** | | २१,१२,७६,३९३.३१ |
| ३,३२,२३,०५८.०० | १) वैधानिक राखीव निधी | ३,७७,६९,०२७.०० | |
| ५२,००,०००.०० | २) स्टँडर्ड ॲसेट पोटी तरतुद | ५२,००,०००.०० | |
| ८५,९९,८८९.५० | ३) इमारत निधी | १,२१,००,०००.०० | |
| १८,३८०.५८ | ४) लाभांश समानिकरण निधी | ६,२७,३५८.५८ | |
| ६,६५,००,०००.०० | ५) बुडीत व संशयीत गुंतवणुक तरतुद | ७,२०,००,०००.०० | |
| ६,००,०००.०० | ६) विशेष बुडीत संशयीत गुंतवणुक निधी तरतुद | ६,००,०००.०० | |
| १,७२,५०,११९.०० | ७) गुंतवणुक चढ-उतार निधी | ५,०२,५०,११९.०० | |
| ३,३९,८४,४५९.०० | ८) इमारत पुर्नमुल्यांकन निधी | ३,३९,८४,४३२.०० | |
| | **इतर निधी** | | |
| ८,४८,०१३.२६ | १) सभासद कल्याण निधी | ९,९३,४९९.९३ | |
| १,०२,३७७.७५ | २) शाखा विस्तार निधी | ९,०२,३७७.७५ | |
| ३,१२,३६५.०९ | ३) नागरी कल्याण निधी | ३,९८,३६५.०९ | |
| ९,०००.०० | ४) सहकार तत्व प्रचार निधी | ९,०००.०० | |
| ३,३६,२४९.६० | ५) धर्मदाय निधी | ३,३६,२४९.६० | |
| ५,०५,०००.०० | ६) कर्मचारी कल्याण निधी | ५,८५,०००.०० | |
| ३,००,५७९.०० | ७) विद्यार्थी शिष्यवृत्ती निधी | ३,५२,०८०.०० | |
| २,४०,६८,३८२.०० | ८) गुंतवणुक घसारा राखीव निधी | १,८०,६८,३८२.०० | |
| ५,७२,०००.०० | ९) प्रशिक्षण निधी | ८,०२,०००.०० | |
| ६,००,०००.०० | १०) बँक संचालक निवडणुक निधी | ६,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | ११) आयकर कायदा ३६(१) (VIIA) तरतुद | ५,००,०००.०० | |
| १,१५,००,०००.०० | १२) एन.पी.ए. व्याज तरतुद | १,३९,००,०००.०० | |
| १२,९८,५०२.३६ | १३) सुवर्ण महोत्सव निधी | १२,९८,५०२.३६ | |
| | **३] ठेवी व इतर खाती** | | |
| | **१] कायम ठेवी** | | |
| ९७,११,५१,१७१.२२ | अ) व्यक्तीगत | ६३,२६,८२,४६२.०२ | ९२,३४,४९,६७३.०० |
| ०.०० | ब) मध्यवर्ती बँक | ०.०० | |
| २१,२९,७९,७४५.०० | क) इतर सोसायट्या | ८,९८,५६,४३०.०० | |
| ०.०० | ड) कर्मचारी निधी | ०.०० | |
| १४५,२१,६५,०११.३६ | पुढील पानावर .............................. | | ११९,६९,४२,८६६.३१ |

संपणाऱ्या वर्षाचे आढावा पत्रक (अ)

| सन २०१७-२०१८ रूपये पैसे | मालमत्ता | रूपये पैसे | सन २०१८-२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ७,१४,३५,१२८.२० | **१) रोख रकमा** | | ५,३६,४६,३९८.४६ |
| | हातातील, रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया अपेक्स व मध्यवर्ती बँकेतील | | |
| | **२) इतर बँकामधील ठेवी** | | ५१,७७,३५३.८५ |
| ६,२३,८३,६७७.०७ | अ) चालु खाते | ५१,७७,३५३.८५ | |
| ०.०० | **३) मनी ॲट कॉल व शार्ट नोटीस** | | — |
| | **४) गुंतवणुक** | | १७,९५,७८,४६६.०० |
| ४६,५४,२२,८७८.०० | १. सेंट्रल गर्व्हमेंट सिक्युरिटीज | १६,०८,७३,७४७.०० | |
| ३,२८,४१,८८९.०० | २. जिल्हा बँक मुदत ठेवी | ३५,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | ३. इतर गुंतवणुक एम.ए.स्किम करिता | ०.०० | |
| ६,००,०००.०० | ४. जिल्हा बँक शेअर्स | ६,००,०००.०० | |
| १,५२,७६,०८१.०० | ५. स्टेट बँक ऑफ इंडिया मुदत ठेव | १,४६,०४,७१९.०० | |
| | **५) कर्जे** | | १०२,२२,७१,४४४.४८ |
| | **अ) अल्प मुदती कर्जे** | | |
| ६१,०१,१४१.२५ | १. अल्प मुदत व्यापारी कर्जे | ५३,२६,७१३.२० | |
| १,५९,०८१.२० | २. विनातारण जामिनकी कर्जे | १,३०,४८९.२० | |
| ४२,८०४.०० | ३. नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट कर्जे | ०.०० | |
| ३०,५२,३२४.०० | ४. सोने तारण कर्जे | २७,५४,४९८.०० | |
| ४,२७,९९,४४५.०० | ५. गोडाऊन कर्जे | २,०४,२७,६६६.०० | |
| ५,१८,७५,२४९.८२ | ६. मुदत ठेव कर्जे | ८,८१,३८,०९०.४६ | |
| १,९३,३०,५०६.०० | ७. हायपोथीकेशन टेम्पररी ओव्हर ड्रॉफ्ट कर्जे | १,४७,१२,८२९.३६ | |
| ०.०० | ८. धनवर्धीनी ठेव कर्जे | ४२१.०० | |
| ७७,१८,२०,२०४.५४ | पुढील पानावर | | १२६,०६,७३,६६२.७९ |

**ता. ३१ मार्च २०१९ रोजी**

| सन २०१७-२०१८ रुपये पैसे | जबाबदाऱ्या | रुपये पैसे | सन २०१८-२०१९ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १४५,२१,६५,०९९.३६ | मागील पानावरुन | | ११९,६९,४२,८६६.३१ |
| | **२) बचत ठेवी** | | |
| १७,८८,९४,८३७.९६ | अ) व्यक्तीगत | १३,८८,५९,८९५.४७ | |
| ०.०० | ब) मध्यवर्ती बँक | ०.०० | |
| ३१,९९,७९९.८२ | क) इतर सोसायट्या | २२,३२,४८३.५६ | |
| ०.०० | ड) कर्मचारी निधी | ०.०० | |
| | **३) चालु ठेवी** | | |
| ४,३०,३८,४०६.७३ | अ) व्यक्तीगत | १,४६,४४,१२४.४९ | |
| ०.०० | ब) मध्यवर्ती बँक | ०.०० | |
| ५,६१,७४,७९६.२७ | क) इतर सोसायट्या | २,८१,१०,७०३.४६ | |
| ०.०० | ड) कर्मचारी निधी | ०.०० | |
| २,०६,८१,१५६.०० | **४) सुलभ संचय ठेव योजना** | १,७०,६३,५७४.०० | |
| | **४) देणी (बाहेरील कर्ज)** | | ६,१८,३१,८६०.९१ |
| | १) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्टेट | | |
| | सेंट्रल को-ऑप. बँकेचे | | |
